MHST200009992020

## कि.दि.अर्ज क्र.३३/२०२३ मधील निशाणी क्र.२० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या वकिलांनी अर्जदार हिचा पुरावा नोंदविणेकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिचे असे कथन आहे की, वि.दि.मु.नं.९२/२०१४ याचा दि.०२.११.२०१८ रोजी न्यायनिर्णय होवुन हुकूमनामा झालेला आहे. सदर दाव्यामध्ये एकतर्फा सुनावणी घेण्यात आली होती. सदर एकतर्फा हुकूमनामा रद्द होवुन मुळ दाव्याची गुणावगुणावर सुनावणी घेण्यात यावी यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार ही वयस्कर महिला असुन तिला हिंडता-फिरता येत नाही. अर्जदार ही वयोमानामुळे एकाच ठिकाणी अंथरुणावर झोपुन आहे. सदर अर्जदार तिचा तोंडी पुरावा देण्याकरीता न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहु शकत नाही. सदर अर्जाचा गुणावगुणावर निर्णय होणेकरीता तिचा तोंडी पुरावा देणे आवश्यक आहे. त्यामुळे तिने अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

३. सामनेवाला याने असे कथन केले आहे की, सदर अर्जातील मजकुर मान्य व कबुल नाही. पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करता येणार नाही. सदरचा अर्ज कायदेशीर नाही. त्यामुळे त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करावा.

४. सामनेवाला याच्या विद्वान विधीज्ञांनी अर्जदार ही आजारी असुन चालु फिरु शकत नाही ही बाब मान्य केली आहे. सदर अर्जदार ही २१/३, बंडगार्डन रोड, पुणे येथील रहिवाशी आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रकरणाचे मुळ अभिलेख न्यायालयीन कर्मचारी यांच्यासमवेत पुरावा नोंदविणेकरीता पुणे येथे घेऊन जावे लागेल.

सदर कर्मचारी यांना न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर पाठविण्याकरीता मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांची परवानगी लागेल. परंतु, अर्जदार यांचा पुरावा हा दुरचित्रफितीद्वारे (व्ही.सी.द्वारे) नोंदवणे शक्य आहे. त्याकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करण्याची कोणतीही आवश्यकता नाही असे मला वाटते. त्यामुळे, मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. परंतु, दुरचित्रफितीद्वारे पुरावा नोंदवणेस मुभा देणे योग्य व न्यायोचित राहील असे मला वाटते. अर्जदार ही पुणे येथील न्यायालयात देखील जावु शकत नसल्याने दोन्ही पक्षकारांच्या कनिष्ठ विधिज्ञांनी अर्जदार हिच्या घरी पुरावा नोंदवताना उपस्थीत राहणेबाबत निर्देश देणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## **आदेश**

१) अर्ज (नि.२०) नामंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार व सामनेवाला यांच्या कनिष्ठ विधिज्ञांनी पुणे येथे अर्जदार हिच्या घरी दुरचित्रफितीद्वारे पुरावा नोंदवताना उपस्थीत रहावे असा निर्देश देण्यात येतो.

३) अर्जदार व सामनेवाला यांच्या वरिष्ठ विधिज्ञांनी न्यायालयात उपस्थीत राहुन दुरचित्रफितीद्वारे अर्जदार हिचा पुरावा नोंदवण्यास परवानगी देण्यात येते.

४) दोन्ही पक्षकारांनी दुरचित्रफितीद्वारे पुरावा नोंदविण्याची तारीख पुढील तारखेपर्यंत या न्यायालयास कळवावी.

५) अर्जदार व सामनेवाला यांच्या कनिष्ठ विधिज्ञांना पुणे येथे नेणे-आणणेचा खर्च अर्जदार हिने करावा.

६) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.11.14 16:50:45 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : १४/११/२०२५

( ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.